
केसरी | २३ सप्टेंबर २०२५



इचलकरंजी : इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयात आभा कार्ड नोंदणी वेळी उपस्थित कॅडेट व रुग्णालय अधिकारी.

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानात डीकेएएससीच्या कॅडेटसचा सहभाग

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालय व आयजीएम रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयजीएम रुग्णालयामध्ये स्वस्थ नारी, सशक्त परिवार या शासकीय अभियानाअंतर्गत विविध उपक्रम घेतले. यात डीकेएएससी महाविद्यालयातील एनसीसी विभागातील कॅडेटनी सहभाग घेतला. यामध्ये प्रामुख्याने रुग्णांची तसेच त्यांच्या नातेवाईकांचे त्याचप्रमाणे आरोग्य संदर्भातील तपासणीसाठी आलेल्या नागरिकांचे आभा कार्ड रजिस्ट्रेशन करण्याचे काम डीकेएएससी महाविद्यालयातील एनसीसी विभागातील कॅडेटनी केले. या उपक्रमामध्ये ४०० नागरिकांचे आभा कार्ड रजिस्ट्रेशन करून दिले. यावेळी रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. संतोष पोळ, डॉ. अमित सोहनी, डॉ. प्रकाश मोरे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. लेफ्ट. विनायक भोई सहभागी झाले.

23/09/25

23/09/25

केसरी २६ सप्टेंबर २०२५/

# डीकेएएससीच्या खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ योगासन संघात निवड

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजीच्या खेळाडूंची चेन्नई येथे होणाऱ्या वेस्ट झोन इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे.



इचलकरंजी : योगासन संघात निवड झालेल्या खेळाडूंना शुभेच्छा देताना प्राचार्य एस. के. खाडे व शिक्षक.

डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज येथे झालेल्या आंतरविभागीय योगासन स्पर्धेत सन्मती सगरे व ऐश्वर्या पाटील यांनी ट्रॅडीशनल टीम या प्रकारात पाचवा आणि सहावा क्रमांक पटकावला तर सौरभ पाटील याने ट्राडीशनल वयक्तिक प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून शिवाजी विद्यापीठ संघात स्थान निश्चित केले. या खेळाडूंना प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांचे प्रोत्साहन लाभले. महाविद्यालयाचे प्रबंधक श्री आर. बी. जोग, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

YellowBlack

26/09/25

25/09/25

तरुण भारत सोमवार २९ सप्टेंबर २०२५

# 'डीकेएएससी'मध्ये आविष्कार कॉम्पिटिशनचे उद्घाटन

प्रतिनिधी

इचलकरंजी

येथील डी.के.ए.एस.सी. कॉलेजमध्ये संशोधन विकास कक्ष, बौद्धिक संपदा अधिकार व अविष्कार समिती अंतर्गत प्री आविष्कार कॉम्पिटिशन २०२५-२६ : व्हिजन स्पार्क संशोधन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते झाले. समन्वयक डॉ. एस. व्ही. मुळीक यांनी, स्पर्धेचा उद्देश, नियमावली, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या संधी यांची माहिती दिली.

या स्पर्धेत महाविद्यालयातील विविध विभागातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. एकूण ३१ पोस्टर्स आणि मॉडेल्स सहा वेगवेगळ्या श्रेणींमध्ये सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संशोधनाधारित विविध विषयांवर आकर्षक व माहितीपूर्ण सादरीकरण केले. प्राचार्य प्रा. डॉ. खाडे यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांना संशोधन क्षेत्रात पुढे जाण्यास प्रोत्साहित केले.



इचलकरंजी : स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. खाडे, डॉ. धीरज शिंदे, प्रा. प्रियांका साळोखे, डॉ. प्रदीप पाटील, प्रा. डी. ए. यादव, प्रा. व्ही. पी. पाटील व मान्यवर.

स्पर्धेचे परिक्षक म्हणून डॉ. धीरज शिंदे, प्रा. प्रियांका साळोखे, डॉ. प्रदीप पाटील यांनी काम पाहिले.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी अविष्कार विभागातील डॉ. एन. एच. शेख, प्रा. पी. सी. पारिशवाड, डॉ. एस. जी. भोसले, डॉ. व्ही. व्ही. गणबावले, डॉ. ए. एच. बोगुलवार, डॉ. ए. एन. पाटील, डॉ. व्ही. एस. पवार, डॉ. आर. एस. रोड्रिक्स, डॉ. एस. के. गावडे, व्ही. बी. काल्कुटकी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे योगदान लाभले.

सूत्रसंचालन डॉ. ए. एन. पाटील यांनी केले. आभार प्रा. डी. ए. यादव यांनी मानले.

तरुण भारत सोमवार दि. २९ सप्टेंबर २०२५



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. प्रकाश काशीद यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, प्रा. रोहीत शिंगे, डॉ. सुभाष जाधव, डॉ. प्रभा पाटील.

# विद्यार्थ्यांनी सर्वांगीण वाचन करून समृद्ध व्हावे

- प्रा. प्रकाश काशीद
- वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

प्रतिनिधी

इचलकरंजी

महाविद्यालयीन जीवन हेच वाचनाने समृद्ध होण्याचे वय आहे. या काळात विद्यार्थ्यांनी चौफेर वाचन करून सर्जनशील लेखनही केले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या लिहिण्या-वाचण्याला चालना मिळावी हा महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ आणि वार्षिक नियतकालिकांचा प्रमुख हेतू आहे, असे मत साहित्यिक प्रा. प्रकाश काशीद यांनी व्यक्त केले. त्यांनी विनोदी एकपात्री अभिनय नाट्यछटा सादर केल्या.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये वाङ्मय मंडळाचे उद्घाटन, विवेक वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे जयंती वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. असा संयुक्त कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी होते. डॉ. एस. के. खाडे, विवेकचे संपादक डॉ. सुभाष जाधव व सहसंपादक डॉ. प्रभा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. रोहित शिंगे यांनी केले. याप्रसंगी प्रा. डी. ए. यादव, प्रा. व्ही. पी. पाटील, प्रबंधक आर. बी. जोग, ग्रंथपाल प्रा. प्रतिभा पाचंगे, प्रा. बाळासाहेब चावरे, प्रा. अपर्णा कांबळे, प्रा. प्रथमेश गवळी, प्रा. संदीप पाटील, डॉ. रिटा रॉड्रीक्स, प्रा. पद्मा पाटील, प्रा. स्नेहल लिम्रस, सदस्य, लव्हर्स ग्रुप यांचे विशेष सहकार्य लाभले. सूत्रसंचालन डॉ. अंजली उबाळे यांनी केले. आभार प्रा. अर्चना नंदगावे यांनी मानले.

29/09/25

सकाळ TODAY

कोल्हापूर, सोमवार, २९ सप्टेंबर २०२५

# मल्लखांब खेळाडूंचा 'डीकेएएससी'त सत्कार

इचलकरंजी, ता. २८ : डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी मल्लखांब स्पर्धेत यश मिळवले. चार खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका आयोजित या शासकीय मल्लखांब स्पर्धा डीकेटीई इंग्लिश मीडियम स्कूल या येथे झाल्या.

स्पर्धेत महाविद्यालयाच्या मल्लखांब खेळाडूंनी अप्रतिम कसरती सादर केल्या. स्पर्धेत श्रुती मांगलेकर द्वितीय, केतकी बोंगे तृतीय, अनुष्का चिरमुठे चतुर्थ व दिया इंगळे हिने पाचवा क्रमांक पटकावला. त्यांनी केलेल्या या कामगिरीमुळे या सर्व खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंनी केलेल्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगांवाले व प्रबंधक आर बी जोग यांचे मार्गदर्शन लाभले.



इचलकरंजी : शासकीय मल्लखांब स्पर्धेतील डीकेएएससी महाविद्यालयाच्या यशस्वी खेळाडूंचा प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी सत्कार केला.

29/09/25

केसरी ३० सप्टेंबर २०२५

# विद्यार्थ्यांनी सर्वांगीण वाचन करून समृद्ध व्हावे : काशीद

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी येथे महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाचे उद्घाटन, महाविद्यालयाच्या ६१ व्या विवेक वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे जयंती वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ असा संयुक्त कार्यक्रम पार पडला. या समारंभाचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. प्रकाश काशीद यांच्याहस्ते केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य एस. के. खाडे होते.

प्रा. प्रकाश काशीद म्हणाले, महाविद्यालयीनजीवनहेचवाचनाने समृद्ध होण्याचे वय आहे. या काळात विद्यार्थ्यांनी चौफेर वाचन करून सर्जनशील लेखनही केले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या लिहिण्या-वाचण्याला चालना मिळावी, हा महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ आणि वार्षिक नियतकालिकांचा प्रमुख हेतू आहे.

प्राचार्य डॉ. एस. के. खाडे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना अपेक्षित ज्ञान, विज्ञान व सुसंस्कारांनी संपन्न विद्यार्थी तयार व्हावेत, यासाठी वाङ्मय मंडळ हे महत्त्वाचे व्यासपीठ ठरते. यावेळी डॉ. सुभाष जाधव व डॉ. प्रभा पाटील यांनी मनोगते व्यक्त केले.

प्रास्ताविक प्रा. रोहित शिंगे यांनी केला. याप्रसंगी प्रा. डी. ए. यादव, प्रा. व्ही. पी. पाटील, प्रबंधक आर. बी. जोग, ग्रंथपाल प्रा. प्रतिभा पाचंगे उपस्थित होते.

30/09/25

Arshad 30/09/25

केसरी
३० सप्टेंबर २०२५



इचलकरंजी : युवा महोत्सवातील विजेते विद्यार्थी.

# दत्ताजीराव कदम महाविद्यालयाचे मध्यवर्ती युवा महोत्सवात यश

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज येथे ४५वा मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. एकूण १७८ महाविद्यालयांनी या महोत्सवात सहभाग नोंदवला. यात दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास घवघवीत यश प्राप्त झाले आहे. मध्यवर्ती युवामहोत्सवात महाविद्यालयास एकूण ११ बक्षिसे प्राप्त झाली. त्यात मुकनाट्य प्रथम, शोभायात्रा प्रथम, कातरकाम द्वितीय, शास्त्रीय तालवाद्य द्वितीय, शास्त्रीय सूरवाद्य तृतीय, पाश्चिमात्य समूह गीत तृतीय, एकपात्री अभिनय चौथा, शास्त्रीय नृत्य चौथा, मातीकाम चौथा, पाश्चिमात्य एकल गायन पाचवा, लोकनृत्य पाचवा अशा विविध कला प्रकारातील यशांचा समावेश आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. प्राचार्य डॉ. शंकर खाडे यांनी विद्यार्थ्यांचा सत्कार केला.

तरुण भारत मंगळवार ३० सप्टेंबर २०२५

# शिक्षकांनी अद्ययावत राहणे आवश्यक

▪ प्राचार्य डॉ. संजय खोत

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

आजच्या आधुनिक आणि बदलत्या काळात, माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांनी आपल्या नेहमीच्या ज्ञानाबरोबरच अद्ययावत राहणे आवश्यक आहे. आजच्या युगात सर्वांसाठी मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध होत आहे पण विद्यार्थ्यांनी आणि अन्य सर्वांनीच माहिती पासून ज्ञानाकडे वाटचाल करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शरद इन्स्टिट्यूटचे माजी प्राचार्य डॉ. संजय खोत यांनी केले.



इचलकरंजी : टीचर एक्सलन्स अवॉर्ड २०२५ सन्मान प्राप्त शिक्षकांसमित प्रमुख पाहुणे व पदाधिकारी.

येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल, रोटरी एक्झिक्यूटिव्ह, रोटरी टेक्सटाईल सिटी आणि रोटरी क्लब ऑफ अतिग्रे यांच्या वतीने आयोजित टीचर एक्सलन्स अवॉर्ड २०२५ कार्यक्रमात ते बोलत होते. रोटरी प्रांत ३१७०चे सहाय्यक प्रांतपाल गिरीश कुलकर्णी, कमलेश लड्डा यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात पाहुण्यांच्या हस्ते मेघना संजय निकम (श्री बालाजी बाल विद्या मंदिर), इरफान अब्दुलमुनाफ पटेल (शाहीर अमरशेख उर्दू विद्या मंदिर), सोनिया पाटील (केसीपी ऑलिंपियाड), स्मिता सचिन बेडक्याळे (व्यंकटेश्वरा इंग्लिश स्कूल), प्रा. डॉ. दिगंबर कुलकर्णी (डांगे महाविद्यालय हातकणंगले), प्रा. डॉ. शंकर किसन खाडे (डीकेएएससी कॉलेज), शिराज अब्दुलमजिद शेख (क्रीडा शिक्षक) आणि अमृता केदार कुलकर्णी (संगीत शिक्षिका) यांचा गौरव करण्यात आला.

सत्कारमूर्ती शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले. रोटरी क्लब एक्झिक्युटिव्हचे अध्यक्ष संतोष साधले यांनी स्वागत केले. रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष घनश्याम सावलानी यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख रोटरी क्लब टेक्सटाईल सिटीच्या सेक्रेटरी आभा थांदनीया यांनी करून दिली. सन्मानप्राप्त शिक्षकांचा परिचय प्रा. डॉ. अमर कांबळे यांनी करून दिला.

रोटरी क्लब अतिग्रेच्या अध्यक्षा प्रा. डॉ. शर्मिला सावळे यांनी आभार मानले. व्यासपीठावर सर्व क्लबचे सेक्रेटरी प्रा. कांबळे, मयूर पाटील, शशिकला गुरव उपस्थित होते. सूत्रसंचालन संजय होगाडे, प्रा. डॉ. प्रशांत कांबळे यांनी केले.

30/09/25


30/09/25

महासत्ता गुरुवार, ता. २ ऑक्टोबर २०२५

# आधुनिक युगात शिक्षकांनी अद्ययावत रहावे-खोत

इचलकरंजी, ता. १-

आजच्या आधुनिक आणि बदलत्या काळात, माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांनी आपल्या नेहमीच्या ज्ञानाबरोबरच अद्ययावत राहणे आवश्यक आहे. आजच्या युगात सर्वांसाठी मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध होत आहे पण विद्यार्थ्यांनी आणि अन्य सर्वांनीच माहिती पासून ज्ञानाकडे वाटचाल करणे गरजेचे आहे, अशा आशयाचे प्रतिपादन शरद इन्स्टिट्यूटचे माजी प्राचार्य डॉ. संजय खोत यांनी केले.



उत्कृष्ट शिक्षक सत्कार समारंभप्रसंगी सन्मानप्राप्त शिक्षक, प्रमुख पाहुणे व पदाधिकारी.

येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल, रोटरी एक्झिक्युटिव्ह, रोटरी टेक्सटाईल सिटी आणि रोटरी क्लब ऑफ अतिग्रे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'टीचर एक्सलन्स अवॉर्ड २०२५' या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते. स्वापूर्ती रोटरी प्रांत ३१७०चे [illegible] प्रांतपाल [illegible] कुलकर्णी आणि कमलेश लड्ढा यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात पाहुण्यांच्या हस्ते सौ. मेघना निकम, इरफान पटेल, सौ. सोनिया पाटील, सौ. स्मिता वेडनपाळे, प्रा. डॉ. दिगंबर कुलकर्णी, प्रा. डॉ. [illegible] खोत, शिराज शेख आणि सौ. अनुजा कुलकर्णी यांना शाल आणि सन्मानपत्र प्रदान करून गौरव करण्यात आले.

प्रारंभी संतोष साधले यांनी स्वागत तर घनश्याम सावलानी यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख सौ. आभा धांदनीया यांनी करून दिली. प्रा. डॉ. शर्मिला सावळे यांनी आभार मानले. यावेळी व्यासपीठावर सर्व क्लबचे सेक्रेटरी प्रा. कांबळे, मयूर पाटील, सौ. शशिकला गुग्गे उपस्थित होते. सूत्रसंचालन संजय होगाडे आणि प्रा. डॉ. प्रशांत कांबळे यांनी केले. येथील रोटरी श्री दगडूलाल मर्दा मानव सेवा केंद्र सभागृहात झालेल्या कार्यक्रमास निमंत्रित आणि रोटरी परिवारातील सदस्य उपस्थित होते.

केसरी

१ ऑक्टोबर २०२५



इचलकरंजी : बिग बटरफ्लाय मंथ निमित्त मार्गदर्शन करताना प्राचार्य एस. के. खाडे.

# दत्ताजीराव कदम महाविद्यालयात बिग बटरफ्लाय मंथ उत्साहात

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाच्यावतीने राष्ट्रीय फुलपाखरू जागरूकता महिन्यानिमित्त बिग बटरफलाय मंथ उत्साहात साजरा केला. फुलपाखरांची पर्यावरणातील भूमिका या विषयावर व्याख्यान झाले.

स्वागत डॉ. पी. के. वाघमारे यांनी केले. प्रमुख अतिथी डॉ. संतोष उमराणे यांनी फुलपाखरांची विविधता, जीवनचक्रातील टप्पे, अन्नसाखळीतले स्थान तसेच वाढते नागरीकरण आणि कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे होणारे नुकसान यावर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी फुलपाखरांची ओळख करून स्थानिक पातळीवर संवर्धनासाठी बटरफ्लाय गार्डन उभारण्याचे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी भूषविले. सूत्रसंचालन डॉ. अनुजा विभुते यांनी केले. आभार डॉ. एन. एच. शेख यांनी मानले.

03/10/25

03/10/25

सकाळ सोमवार, ६ ऑक्टोबर २०२५



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये वाङ्मय मंडळाचे उद्घाटन व वार्षिक नियतकालिकाचा प्रकाशन समारंभ झाला.

# डीकेएएससीमध्ये वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेज येथे महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाचे उद्घाटन व महाविद्यालयाच्या ६१ व्या 'विवेक' वार्षिक नियतकालिकाचे प्रकाशन व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे जयंती वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ असा संयुक्त कार्यक्रम झाला. या समारंभाचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक व एकपात्री कलावंत प्रा. प्रकाश काशीद यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे होते. 'विवेक'चे संपादक डॉ. सुभाष जाधव व सहसंपादक डॉ. प्रभा पाटील यांनी मनोगत व्यक्त केली. प्रा. डी. ए. यादव, प्रा. व्ही. पी. पाटील, प्रबंधक आर. बी. जोग, ग्रंथपाल प्रा. प्रतिभा पाचंगे, प्रा. बाळासाहेब चावरे आदी उपस्थित होते.

06/10/25

06/10/25

केसरी

६ ऑक्टोबर २०२५/




इचलकरंजी : प्राचार्य संजय खोत यांच्याहस्ते प्रा. एस. के. खाडे यांचा सन्मान करण्यात आला.

# डॉ. एस. के. खाडे यांना टीचर एक्सलन्स ॲवॉर्ड प्रदान

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांना रोटरी क्लब ऑफ सेंट्रल, रोटरी क्लब ऑफ एक्झिक्युटिव्ह, रोटरी क्लब ऑफ टेक्स्टाईल आणि रोटरी क्लब ऑफ अतिग्रे यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा टीचर एक्सलन्स अवार्ड नुकताच प्रदान करण्यात आला. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. संजय खोत यांच्याहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मला मिळालेला हा पुरस्कार बापूजींचे संस्कार, सहकारी गुरुदेव कार्यकर्त्यांची सोबत आणि विद्यार्थी या सर्वांमुळे आहे, अशा भावना प्राचार्य खाडे यांनी व्यक्त केल्या.

प्राचार्य खाडे यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी रोटरी संस्थांचे घनश्याम सावलानी, संतोष साधले, प्रकाश लाहोटी, शर्मिला साबळे, प्राचार्य डॉ. प्रशांत कांबळे, डॉ. अमर कांबळे उपस्थित होते.

07/10/25

06/10/25

केसरी

६ ऑक्टोबर २०२५

# डी. के. ए. एस. सी. महाविद्यालयाच्या खेळाडूंची विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका आयोजित शासकीय कुस्तीच्या स्पर्धा व्यंकोबा मैदानावर पार पडल्या. या स्पर्धेतून डी. के. ए. एस. सी. महाविद्यालयाच्या खेळाडूंची विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या पैलवानांनी कौशल्यांचा उत्कृष्ट रीत्या वापर करत विजय प्राप्त केला. यामध्ये फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात प्रेम सुवासे ७४ किलो खालील वजनी गटात प्रथम, करण पवार ७९ किलो खालील वजनी गटात प्रथम, सत्वशील घोरपडे ८६ किलो, खालील वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवला. त्याचप्रमाणे ग्रीको रोमन कुस्ती प्रकारामध्ये ७९ किलो खालील वजनी गटामध्ये ओम शेळके याने प्रथम क्रमांक मिळवला.



इचलकरंजी :विभागीय कुस्ती स्पर्धेतील निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना प्रा. एस. के. खाडे.

प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा संचालक प्री. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले यांचे मार्गदर्शन लाभले.

06/10/25

06/10/25

केसरी ३० सप्टेंबर २०२५/



कोल्हापूर : स्वामी विवेकानंद सहकारी पतसंस्थेची सन वार्षिक सर्वसाधारण सभा शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये खेळीमेळीत पार पडली.

# स्वामी विवेकानंद पतसंस्थेला २ कोटी ५७ लाखाचा नफा

## चेअरमन हितेंद्र साळुंखे : संस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्थेची सन २०२४-२५ ची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या प्रांगणातील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये खेळीमेळीत पार पडली. यावेळी पतसंस्थेला निव्वळ नफा २ कोटी ५७ लाख रुपये झाला असल्याची माहिती चेअरमन हितेंद्र साळुंखे यांनी दिली.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे सी.ई.ओ कौस्तुभ गावडे यांच्याहस्ते संस्थेतील प्राथमिक शिष्यवृत्ती, क्रीडा, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा, गुणवत्ता प्राप् सभासद पाल्यांचा तसेच सन २०२४-२५ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या पतसंस्था सभासदांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कौस्तुभ गावडे यांनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक व अहवाल वाचन पतसंस्थेचे चेअरमन हितेंद्र साळुंखे यांनी केले. आभार पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन दिपक जाधव यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. प्रदीप पाटील यांनी केले. या सभेसाठी पतसंस्थेचे लेखा परीक्षक के. एम. देशपांडेसो, संस्थेचे संचालक, सभासद उपस्थित होते.

सकाळ, गुरुवार, ९ ऑक्टोबर २०२५

# 'डीकेएएससी'च्या खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडूंची चेन्नई येथे होणाऱ्या वेस्ट झोन इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय योगासन स्पर्धेत सन्मती सगरे व ऐश्वर्या पाटील यांनी ट्रॅडिशनल टिम या प्रकारात पाचवा आणि सहावा क्रमांक पटकावला, तर सौरभ पाटीलने ट्रॅडिशनल वैयक्तिक प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून शिवाजी विद्यापीठ संघात स्थान निश्चित केले. त्यांची चेन्नई येथे होणाऱ्या वेस्ट झोन इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

09/10/25

सकाळ बुधवार, ८ ऑक्टोबर २०२५

# 'डीकेएएससी'चे कुस्ती स्पर्धेत यश

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाच्या कुस्ती खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व इचलकरंजी महापालिका आयोजित शासकीय कुस्ती स्पर्धा व्यंकोबा मैदान येथे झाल्या. फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात प्रेम सुवासेने ७४ किलो, करण पवारने ७९ किलो, सत्त्वशील घोरपडेने ८६ किलोत प्रथम क्रमांक मिळवला. ग्रीको रोमन कुस्ती प्रकारामध्ये ७९ किलो वजनीगटात ओम शेळकेने प्रथम क्रमांक मिळवला.

08/10/25

तरुण भारत शुक्रवार १० ऑक्टोबर २०२५

# डीकेएससीमध्ये अभिजात मराठी भाषा दिवस साजरा

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये मराठी विभागाच्यावतीने अभिजात मराठी भाषा दिवस प्रमुख पाहुणे डॉ. युवराज देवाळे यांच्या उपस्थितीत व प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. खाडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. डॉ. युवराज देवाळे यांनी, अभिजात भाषेचा दर्जा मराठी भाषेला मिळाला. ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे. आपल्या भाषेचा म्हणून १५०० ते २००० हजार वर्षांचा स्वतंत्र इतिहास आहे. शिलालेख, ताम्रपट, संत साहित्य, ऐतिहासिक साहित्यातील संदर्भ, मागील काही शतकांमधील विपुल साहित्य कृतींची निर्मिती हा सगळा इतिहास मराठी भाषेला अभिजात बनवण्यामध्ये महत्त्वाचा ठरला, असे सांगितले. प्रास्ताविक डॉ. सुभाष जाधव यांनी केले. यावेळी प्रा. डी. ए. यादव, प्रा. व्ही. पी. पाटील, डॉ. प्रभा पाटील, प्रबंधक आर. बी. जोग उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. भारती कोळेकर यांनी केले. आभार प्रा. रोहित शिंगे यांनी केले मानले.

10/10/25

# विवेकानंद कॉलेजचा बुद्धिबळात डंका

## महिला गट विजेता; पुरुष गटात तृतीय स्थान

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, भडगाव (गडहिंग्लज) यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झोनल महिला व पुरुष बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूरचा महिला बुद्धिबळ संघ विजेता ठरून या संघाने जनरल चॅम्पियनशिप पटकावली, तसेच पुरुष गटात तृतीय क्रमांकाचा मान मिळवत विवेकानंद कॉलेजने दुहेरी यश मिळवले.



कोल्हापूर : बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूरचा विजेता संघ. सोबत मान्यवर.

महिला विभागात सृष्टी कुलकर्णी (बी.बी.ए. भाग ३) हिने तृतीय क्रमांक, मुक्तांजली सावंत (बी.कॉम. भाग ३) हिने पाचवा क्रमांक मिळवला. पुरुष विभागात ऋषीकेश कबनुरकर (बी.कॉम. भाग १) याने प्रथम क्रमांक पटकावत कॉलेजचा झेंडा उंचावला. या यशस्वी खेळाडूंना स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

**केसरी** १३ ऑक्टोबर २०२५,

# डीकेएससीमध्ये अभिजात मराठी भाषा दिवस संपन्न

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी येथे अभिजात मराठी भाषा दिवस या निमित्ताने विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते. सदर समारंभ प्रमुख पाहुणे डॉ. युवराज देवाळे यांच्या उपस्थितीत व प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

डॉ. युवराज देवाळे म्हणाले, अभिजात भाषेचा दर्जा मराठी भाषेला मिळाला ही अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे. आपल्या भाषेचा म्हणून १५०० ते २००० हजार वर्षांचा स्वतंत्र इतिहास आहे. शिलालेख, ताम्रपट, संत साहित्य, ऐतिहासिक साहित्यातले सर्व संदर्भ आणि मागील काही शतकांमधील विपुल साहित्य कृतींची निर्मिती हा सगळा इतिहास मराठी भाषेला अभिजात बनवण्यामध्ये महत्त्वाचा ठरला.

अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी मराठी आपली मातृभाषा आहे. आयुष्य आणि करिअर समृद्ध करत असताना इतर भाषा आत्मसात केल्याच पाहिजेत, परंतु मातृभाषेवर नितांत प्रेम करत मातृभाषेतील विपुल साहित्य संपदा आपण वाचायला हवी.



मार्गदर्शन करताना युवराज देवाळे.

प्रास्ताविक डॉ. सुभाष जाधव यांनी केले. यावेळी प्रा. डी. ए. यादव, प्रा. व्ही. पी. पाटील, डॉ. प्रभा पाटील, प्रबंधक आर. बी. जोग उपस्थित होते. आभार प्रा. रोहित शिंगे यांनी मानले.

13/10/25

13/10/25

सकाळ सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५

# डीकेएएससी कॉलेजमध्ये भितीपत्रिकाचे अनावरण

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये इतिहास विभागातर्फे जागतिक पर्यटन दिनानिमित्त युनेस्को जागतिक वारसा छत्रपती शिवाजी महाराजांचे बारा किल्ले या भित्तीपत्रिकाचे अनावरण करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. कन्या कॉलेजचे इतिहास विभाग प्रमुख डॉ. धीरज शिंदे यांचे विशेष व्याख्यान झाले. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. अरुण कटकोळे यांनी केले. सूत्रसंचालन करुणा यादव हिने केले. आभार प्रा. राहुल कांबळे यांनी मानले. प्रा. व्ही. पी. पाटील, डॉ. सुनील भोसले, प्रा. प्रज्ञावंत कांबळे, डॉ. मालेकर आदी उपस्थित होते.

13/10/25

13/10/25

## थोडक्यात महत्त्वाचे



इचलकरंजी : श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित आरोग्य तपासणी शिबीरावेळी सहभागी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

# डीकेएएससी महाविद्यालयामध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांच्या वाढदिवसानिमित डीकेएएससी महाविद्यालयामध्ये आरोग्य तपासणी शिबिर झाले. प्राध्यापक स्टाफ, प्रशासकीय स्टाफ व एनसीसी कॅडेट, विद्यार्थी, विद्यार्थिनींच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली. यामध्ये डोळे तपासणी, बीपी, शुगर, ई सी जी. या तपासणी करण्यात आल्या. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी, आजच्या दगदगीच्या जीवनामध्ये सर्वजण आरोग्याकडे दुर्लक्ष करतात आणि त्यातूनच गंभीर समस्या भविष्यात निर्माण होतात तर अशा समस्या कोणालाही निर्माण होऊ नये व सर्वांचे आरोग्य सदृढ रहावे यासाठी हे आरोग्य तपासणी शिबिर घेतल्याचे सांगितले. यावेळी निवा बुपा हेल्थ सेंटरचे सागर गाडगीळ, नंदादीप हॉस्पिटल व सिद्धिविनायक हॉस्पिटलचा स्टाफ तपासणीसाठी उपस्थित होता. प्रा. रोहित शिंगे, प्रा. प्रथमेश गवळी, प्राध्यापक उपस्थित होते. नियोजन एनसीसी विभाग व प्रा. लेफ्ट. विनायक भोई यांनी केले.

दक्षिण महाराष्ट्र
# केसरी
३ नोव्हेंबर २०२५/६



इचलकरंजी : राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झालेल्या खेळाडूंसमवेत प्रा.एस के खाडे व शिक्षक.

# डीकेएएससीच्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रत्नागिरी आयोजित विभागीय मैदानी स्पर्धा डेरवण येथे उत्साह संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत अतुलनीय यश प्राप्त केले. निकिता माने – हॅमर थ्रो खेळ प्रकारात सुवर्ण पदक, रेहान पटाईत – उंच उडी (१९ वर्षाखालील मुले) सुवर्ण पदक. स्वानंद कुंभोजे – थाळी फेकमध्ये सुवर्ण पदक, अथर्व सातपुते – उंच उडी (१७ वर्षाखालील मुले) सुवर्ण पदक. खेळाडूंनी केलेल्या या कामगिरीमुळे त्यांची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंच्या या कामगिरीचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी अभिनंदन केले. यावेळी प्राचार्य डॉ. ए.एन. पाटील व. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर हे उपस्थित होते. खेळाडूंना क्रीडा संचालक भोई विनायक यांचे मार्गदर्शन लाभले, तर सुभाष माने, थोरवत, शाम कांबळे यांचे प्रशिक्षण मिळाले.

03/11/2025

3/11/25

सकाळ कोल्हापूर, रविवार, २ नोव्हेंबर २०२५

# डीकेएएससी महाविद्यालयाचा 'सुवर्ण'ठसा

## विभागीय मैदानी स्पर्धा; चार सुवर्णपदके पटकावली, राज्य स्पर्धेसाठी निवड

■ सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. १ : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांच्या वतीने डेरवण येथे नुकत्याच झालेल्या विभागीय मैदानी स्पर्धांमध्ये डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. खेळाडूंनी चार सुवर्णपदके पटकावत विभागीय स्तरावर दबदबा निर्माण केला. विजेत्या खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

निकिता माने हिने हॅमर थ्रो प्रकारात सुवर्णपदक मिळवून महिला गटात वर्चस्व सिद्ध केले. रेहान पटाईत (१९ वर्षांखालील मुले) आणि अथर्व सातपुते (१७ वर्षांखालील मुले) या दोघांनी उंचउडी प्रकारात सुवर्णपदक मिळवून दमदार झेप घेतली. स्वानंद कुंभोजे याने थाळीफेक प्रकारात सुवर्णपदक मिळविले. खेळाडूंच्या यशामुळे त्यांची राज्यस्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी विजेत्या खेळाडूंचा सत्कार केला. यावेळी बापूजी साळुंखे कॉलेज, मिरजचे प्राचार्य डॉ. ए. एन. पाटील, प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर उपस्थित होते. खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. लेफ्टनंट विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगिवाले यांचे मार्गदर्शन लाभले. सुभाष माने, श्री. थोरवत, शाम कांबळे यांनी प्रशिक्षण दिले.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंची विभागीय मैदानी क्रीडा प्रकारात चार सुवर्ण पटकावत यश मिळवले.

03/11/2025

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
२५ नोव्हेंबर २०२५

# डी.के.ए.एस.सी. कॉलेजमार्फत पूरबाधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



इचलकरंजी : पुरबाधित भागात शालेय साहित्य वाटप करताना डिकेएएससी कॉलेजचे प्राध्यापक व विद्यार्थी

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मार्फत सोलापूर जिल्ह्यातील के. एन. भिसे आर्टस, कॉमर्स अँड विनायकराव पाटील सायन्स कॉलेज, भोसरे महाविद्यायातील पुरबाधित शंभर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

पुरबाधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करणेची संकल्पना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या विचारातून आमलात आणण्यात आली. हा उपक्रम राबवण्याविषयीकौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील एन.एस.एस., एन.सी.सी. वसांस्कृतिकविभागाम र्फत इचलकरंजी शहरातील विविध विभागात विद्यार्थ्यांनी पुरबाधित विद्यार्थ्यांसाठी आर्थिक मदत गोळा केली. यातून साठ हजार भरीव मदत गोळा झाली. यातून प्रत्येक विद्यार्थ्याला एक सॅक, अर्धाडझन मोठ्यावह्या, पेन पेन्सिल, कंपास इतके शैक्षणिक साहित्य सीना नदीच्या पुरामध्ये वाकव, ल्हावे, पापसन, साडे इ. गावातील शंभर पुरबाधित विद्यार्थी-विद्यार्थिनींना देण्यात आली.

या प्रसंगी माढा एज्युकेशन संस्थेचे सचिव बाळासाहेब भिसे, प्राचार्य डॉ. प्रकाश कांबळे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी डॉ. सुनिल भोसले (एन . एस. एस . प्रकल्प अधिकारी ) यांनी आपल्या मनोगता मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेविषयी व डी.के.ए.एस. सी. कॉलेजच्या सामाजिक उपक्रमांची माहिती सांगितली. यातून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव झाल्याचे दिसून आले. अध्यक्ष बाळासाहेब भिसे यांनी अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्ती विषयी माहिती सांगून दोनशे पंचवीस किलोमीटर इतक्या दूरवर असणाऱ्या डी.के. ए. एस. सी. कॉलेजने पुरबाधित विद्यार्थ्यांच्यासाठी केलेल्या मदतीविषयी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी एन. एस. एस. प्रकल्प अधिकारी डॉ. सुनिल भोसले, डॉ. सुभाष जाधव, प्रा. दिगंबर नागर्थवार, प्रा निलेश जाधव, प्रा. संदीप पाटील व अर्शद पाथरवट उपस्थित होते.

06/11/25

सकाळ, गुरुवार, ६ नोव्हेंबर २०२५

# डीकेएएससी महाविद्यालयाचे विभागीय योगा स्पर्धेत यश

■ सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. ५ : डीकेएएससी महाविद्यालयाच्या योगा खेळाडूंनी विभागीय योगा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत प्रभावी कामगिरी केली आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड निश्चित केली. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर व इचलकरंजी महापालिका क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धा योग भवन येथे पार पडल्या.

या स्पर्धेत महाविद्यालयाच्या हर्षदा करंबेळकर हिने ट्रॅडिशनल योगा प्रकारात सुवर्णपदक मिळवले. तसेच ऱ्हिदमिक योगा प्रकारात हर्षदा करंबेळकर व शर्वरी माळी या जोडीने उत्कृष्ट समन्वय दाखवत सुवर्णपदक पटकावले. शर्वरी माळीने आर्टिस्टिक सोलो प्रकारातही सुवर्णपदक मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली. तसेच आर्टिस्टिक पेअर प्रकारातही तिने सुवर्ण कामगिरीची नोंद केली.

या उल्लेखनीय यशामुळे दोन्ही खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, ज्युनिअर विभागप्रमुख शशिकांत कुंभार यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रशिक्षक सुहास पवळे यांचे मार्गदर्शन लाभले.



इचलकरंजी : राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या डीकेएएससी महाविद्यालयाच्या योगा खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
६ नोव्हेंबर २०२५/९



राज्यस्तरीय योगा स्पर्धेत निवड झालेल्या खेळाडूंना शुभेच्छा देताना प्रा.एस के खाडे व इतर.

# डीकेएएससी महाविद्यालयाच्या योगा खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय योगा स्पर्धा इचलकरंजी येथील योग भवन येथे झाल्या. त्यात डीकेएएससी महाविद्यालयाच्या हर्षदा करंबेळकर व शर्वरी माळी या योगा खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली.

हर्षदा करंबेळकर हिने ट्रॅडिशनल योगा स्पर्धेत गोल्ड मेडल तसेच रीदमिक खेळ प्रकारात हर्षदा व शर्वरी माळी या जोडीने गोल्ड मेडल मिळवले. त्याचप्रमाणे शर्वरीने आर्टिस्टिक सोलो खेळ प्रकारामध्ये गोल्ड मेडल मिळवले व आर्टिस्टिकमध्ये पेअर करून या योगा खेळ प्रकारातील स्पर्धेमध्ये देखील गोल्ड मेडल मिळवले. त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी या खेळाडूंचे अभिनंदन केले.

या खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले यांचे मार्गदर्शन मिळाले.

06/11/25

Arshad
06/11/25

तरुण भारत गुरुवार, ६ नोव्हेंबर २०२५



# डीकेएएससीच्या योगा खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**इचलकरंजी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय कोल्हापूर व इचलकरंजी महापालिका क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय योगा स्पर्धा येथील योग भवन येथे झाल्या. डीकेएएससी महाविद्यालयाच्या हर्षदा करंबेळकर व शर्वरी माळी या योगा खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. हर्षदा करंबेळकर हिने ट्रॅडिशनल योगा स्पर्धेत गोल्ड मेडल. तसेच रीदमिक खेळ प्रकारात हर्षदा करंबेळकर व शर्वरी माळी या जोडीने गोल्ड मेडल मिळवले. त्याचप्रमाणे शर्वरी माळी या खेळाडूने आर्टिस्टिक सोलो खेळ प्रकारामध्ये गोल्ड मेडल मिळवले व आर्टिस्टिक मध्ये पेअर करून या योगा खेळ प्रकारातील स्पर्धेमध्ये देखील गोल्ड मेडल मिळवले. त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. प्राचार्य डॉ. एस के खाडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. क्रीडा संचालक प्रा. विनायक भोई, प्रा. मुजफ्फर लगीवाले यांचे मार्गदर्शन मिळाले. सुहास पवळे यांचे प्रशिक्षण मिळाले.

06/11/25

06/11/25

सकाळ शुक्रवार, ७ नोव्हेंबर २०२५



सोलापूर : डीकेएएससी कॉलेजने सोलापूर जिल्ह्यातील पूरबाधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.

# 'डीकेएएसी'तर्फे पूरबाधित विद्यार्थ्यांना मदत

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी कॉलेजने सोलापूर जिल्ह्यातील पूरबाधित विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिला. भोसरे येथील के. एन. भिसे आर्टस्, कॉमर्स अँड विनायकराव पाटील सायन्स कॉलेजमध्ये शंभर पूरबाधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. हा उपक्रम श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवला. एनएसएस एनसीसी आणि सांस्कृतिक विभागामार्फत विद्यार्थ्यांनी शहरातील विविध भागांत फिरून आर्थिक मदत गोळा केली. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही योगदान देत ६० हजार रुपये मदत जमा केली. यातून प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक सॅक, मोठ्या वह्या, पेन, पेन्सिल, कंपास आदी साहित्य दिले. साहित्य वितरण माढा एज्युकेशन सोसायटीचे सचिव बाळासाहेब भिसे आणि प्राचार्य डॉ. प्रकाश कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील भोसले, प्रा. डॉ. सुभाष जाधव, प्रा. दिगंबर नागर्थवार, प्रा. नीलेश जाधव, प्रा. संदीप पाटील, अर्शद पाथरवट आदी उपस्थित होते.

07/11/2025

07/11/25

तरुण भारत शनिवार, ८ नोव्हेंबर २०२५



# डीकेएएससीच्या खेळाडूंची मैदानी खेळात राज्य स्पर्धेसाठी निवड

**इचलकरंजी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रत्नागिरी आयोजित विभागीय मैदानी स्पर्धेमध्ये डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत अतुलनीय यश प्राप्त केले. निकिता माने – हॅमर थ्रो खेळ प्रकारात सुवर्ण, रेहान पटाईत – उंच उडी (१९ वर्षाखालील मुले) सुवर्ण पदक. स्वानंद कुंभोजे – थाळी फेकमध्ये सुवर्ण, अथर्व सातपुते – उंच उडी ( १७ वर्षाखालील मुले) सुवर्ण पदक. खेळाडूंनी केलेल्या या कामगिरीमुळे त्यांची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली. खेळाडूंच्या या कामगिरीचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी कौतुक करत अभिनंदन केले. यावेळी बापूजी साळुंखे कॉलेज मिरजचे प्राचार्य डॉ. ए. एन. पाटील, प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर उपस्थित होते. क्रीडा संचालक विनायक भोई, लगिवाले मुजफ्फर यांचे मार्गदर्शन लाभले. सुभाष माने, श्री. थोरवत , शाम कांबळे यांचे प्रशिक्षण मिळाले.

तरुण भारत
बुधवार, १२ नोव्हेंबर २०२५



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज आणि माय भारत केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सरदार १५० युनिटी मार्च पदयात्रा झाली.

# इचलकरंजीत सरदार @ १५० युनिटी मार्च पदयात्रेला प्रतिसाद

इचलकरंजी : शहरामध्ये भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी आणि माय भारत केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सरदार @१५० युनिटी मार्च' पदयात्रा आयोजित केली होती. यामध्ये दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजीच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० स्वयंसेवक सहभागी झाले होते. यावेळी महापालिका आयुक्त पल्लवी पाटील, माय भारत केंद्र जिल्हा कार्यक्रम अधिकारी स्वप्नील देशमुख, प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील भोसले, डॉ. अजिंक्य पत्रावळे, प्रा. पूजा पारीश्वाड, प्रा. दिगंबर नागर्थवार, प्रा. सरिता पाटील, प्रा. निलेश जाधव, प्रा. संदीप पाटील उपस्थित होते.

13/11/25

13/11/25

सकाळ शुक्रवार, १४ नोव्हेंबर २०२५

# दत्ताजीराव कदम कॉलेजतर्फे पदयात्रा

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेज आणि माय भारत केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सरदार@१५० युनिटी मार्च' पदयात्रा काढली. यात कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील भोसले, डॉ. अजिंक्य पत्रावळे, प्रा. पूजा पारीश्वाड, प्रा. दिगंबर नागर्थवार, प्रा. सरिता पाटील, प्रा. नीलेश जाधव व प्रा. संदीप पाटील आदी उपस्थित होते.

14/11/2025

14/11/25

रविवार, १६ नोव्हेंबर २०२५ | सकाळ

# डीकेएएससी कॉलेजचे यश

## आंतरविभागीय ॲथलेटिक्स, वेटलिफ्टिंगमध्ये चार पदके

सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. १५ : न्यू कॉलेज, कोल्हापूर यांच्या विद्यमाने शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आंतरविभागीय मैदानी स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत यश प्राप्त केले.



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडूंनी आंतरविभागीय ॲथलेटिक्स व वेटलिफ्टिंग स्पर्धेत यश मिळवले.

यामध्ये समीक्षा आडसुळे हिने १.४५ मीटर इतकी उंच उडी टाकत सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. प्रतीक्षा आडसुळे हिने १.४० मीटर इतकी उंच उडी मारत रौप्यपदक पटकावले. हातोडाफेक प्रकारात सौरभ दंडवते याने ४० मीटर लांब हातोडा फेकत कांस्यपदक पटकावले. तसेच देवचंद कॉलेज अर्जुननगर यांच्या विद्यमाने झालेल्या आंतरविभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत क्रिश मोरे याने १६० किलो स्नॅच आणि १४० किलो क्लिन अँण्ड जर्क असे एकूण ३०० किलो इतके वजन उचलून रौप्यपदक पटकावले. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, प्रबंधक आर. बी. जोग यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

17/11/2025

17/11/25

केसरी
१९ नोव्हेंबर २०२५



इचलकरंजी : यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान करताना प्राचार्य डॉ. एस.के. खाडे व शिक्षक.

# डी.के.ए.एस.सी.च्या खेळाडूंचे ॲथलेटिक्स, वेटलिफ्टिंग स्पर्धेत यश

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी** : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आंतर विभागीय मैदानी स्पर्धेत डी.के. ए.एस.सी. कॉलेजच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत यश प्राप्त केले.

यामध्ये समीक्षा आडसुळे हिने १.४५ मीटर इतकी उंच उडी मारून सुवर्ण पदकावर शिक्कामोर्तब केले. प्रतीक्षा आडसुळे हिने १.४० मीटर इतकी उंच उडी मारत रजत पदक पटकावले. हातोडा फेक या प्रकारात सौरभ दंडवते याने ४० मीटर लांब हातोडा फेकत कांस्य पदक पटकावले. तसेच देवचंद कॉलेज, अर्जुननगर यांच्या विद्यमाने झालेल्या आंतरविभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत क्रिश मोरे याने १६० किलो स्नॅच आणि १४० किलो क्लिन अँड जर्क असे एकूण ३०० किलो इतके वजन उचलून रजत पदक पटकावले. क्रिश हा युनिक वेटलिफ्टिंग सेंटरमध्ये उत्तम मेंगणे यांच्याकडे प्रशिक्षण घेतो.

या सर्व खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रबंधक आर. बी. जोग उपस्थित होते. खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन लाभले.

18/11/2025

20/11/25

केसरी २४ नोव्हेंबर २०२५।




इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचा सन्मान करताना मंत्री चंद्रकांत पाटील.

# संकटातून संकल्पाकडे सन्मान सोहळ्यात दत्ताजीराव कदम कॉलेजचा गौरव

**केसरी वृत्तसेवा**

इचलकरंजी : महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि मॉडर्न महाविद्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुरग्रस्त विद्यार्थ्यांना मदत केलेल्या महाविद्यालयांचा संकटातून संकल्पाकडे या उपक्रमांतर्गत सन्मान करण्यात आला. या सोहळ्यात दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी यांचा सन्मान उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाला. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना विभागाने इचलकरंजीत रॅली काढून नागरिकांकडून मदत गोळा केली. शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेत जमा निधीतून सोलापूर जिल्ह्यातील भोसरे गावातील पुरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. या उपक्रमात डॉ. सुनील भोसले, डॉ. अजिंक्य पत्रावळे, पूजा पारिशवाड, डॉ. सारिका पाटील, प्रा. निलेश जाधव, प्रा. संदीप पाटील, कॅ. विनायक भोई, मुजफर लगीवाले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. प्राचार्य डॉ. शंकर खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वी झाला.

२४/११/२५

२५/११/२५

सकाळ, सोमवार, २४ नोव्हेंबर २०२५




इचलकरंजी : सामाजिक कार्याबद्दल डीकेएएससी कॉलेजचा सन्मान मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

# डीकेएएससी कॉलेजचा सन्मान

इचलकरंजी : महाराष्ट्रातील महाविद्यालयांच्या पूरग्रस्त विद्यार्थ्यांना केलेल्या मदतीच्या योगदानानिमित्त 'संकटातून संकल्पाकडे' हा सन्मान सोहळा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या कार्यात डीकेएएससी कॉलेजने स्वयंप्रेरणेने सहभाग नोंदवला. या सामाजिक कार्याबद्दल महाविद्यालयाचा सन्मान या कार्यक्रमात करण्यात आला. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना यांसह लेफ्टनंट प्रा. विनायक भोई, डॉ. सुनील भोसले, डॉ. अजिंक्य पत्रावळे, पूजा पारिशवाड, डॉ. सारिका पाटील, प्रा. नीलेश जाधव, प्रा. मुज्जफर लगीवाले आदींनी या कार्यात परिश्रम घेतले.

24/11/25

24/11/25

तरुण भारत गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५

# डीकेएएससी महाविद्यालयामध्ये एनसीसी डे साजरा

## कौस्तुभ गावडे यांच्या संकल्पनेतून एनसीसी विभागाकडून बालोद्यानातील मुलांना मदतीचा हात



इचलकरंजी : एनसीसी डे निमित्त डीकेएएससी महाविद्यालयातील एनसीसी विभागाने बालोद्यान संस्थेमधील मुलांना शैक्षणिक व इतर साहित्य दिले.

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या संकल्पनेतून एन. सी. सी. डे निमित्त डीकेएएससी महाविद्यालयातील एनसीसी विभागाने बालोद्यान संस्थेमधील मुलांना शैक्षणिक व इतर साहित्य वाटप, श्रमदान व स्नेहभोजन असे उपक्रम राबविण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. के. खाडे होते.

महाविद्यालयातील एन. सी. सी. कॅडेटनी सामाजिक उपक्रमासाठी शहरातून मदत पेटीच्या माध्यमातून निधी गोळा केला. या मदत निधीतून बालोद्यान या संस्थेतील मुलांसाठी ६६ स्वेटर, दोन वॉटर हीटर, १०० किलो साखर व १० डझन वह्या असे शैक्षणिक व इतर साहित्य मदत स्वरूपात दिले आणि आश्रमातील मुलांना स्नेहभोजनाचे नियोजन केले होते. त्याचप्रमाणे एनसीसी कॅडेटनी बालोद्यान परिसरात श्रमदान केले.

प्राचार्य डॉ. एस. के. खाडे म्हणाले, एनसीसी विभागाने आम्हाला व महाविद्यालयाला अभिमान वाटावा अशी गोष्ट केली. महाविद्यालयीन जीवनात समाजसेवेचे भान जपत या मदतीतून आश्रमातील विद्यार्थ्यांसाठी आमच्या विद्यार्थ्यांना, आम्हाला याचा आनंद आहे. एनसीसी विभागप्रमुख प्रा. लेफ्ट. विनायक भोई यांनी, असा उपक्रम एनसीसी विभागाकडून घेता आला व गरजू विद्यार्थ्यांना मदत करता आली, याबद्दल आनंद असून असे उपक्रम सातत्याने घेत राहू, अशा भावना व्यक्त केल्या. याचबरोबरच एनसीसी विभागाने संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांच्याच संकल्पनेतून मागील महिन्यात पूरग्रस्त निधी जमा करून सोलापूर येथील महाविद्यालयास मदत केली. संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांनी हा उपक्रम यशस्वी केल्याबद्दल महाविद्यालयाचे व एनसीसी विभागाचे कौतुक केले. यावेळी प्रा. रोहित शिंगे, प्रा. प्रथमेश गवळी, संजय खुळ, एनसीसी कॅडेट उपस्थित होते.

27/11/25

27/11/25

सकाळ शुक्रवार, २८ नोव्हेंबर २०२५

# 'डीकेएएससी'तर्फे बालोद्यानात विविध उपक्रम

इचलकरंजी, ता. २७ : एनसीसी डे निमित्त डीकेएएससी महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाने सामाजिक उत्तरदायित्व जोपासत 'बालोद्यान' अनाथ आश्रमातील मुलांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप, श्रमदान आणि स्नेहभोजन अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या संकल्पनेतून आणि प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम घेतला.

महाविद्यालयातील एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी शहरात मदतपेटीच्या माध्यमातून निधी गोळा केला. यातून 'बालोद्यान'मधील विद्यार्थ्यांसाठी ६६ स्वेटर, दोन वॉटर हीटर, १०० किलो साखर आणि १० डझन वह्या असे आवश्यक साहित्य दिले. मुलांसाठी स्नेहभोजनाचेही आयोजन केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आश्रम परिसरात स्वच्छता आणि श्रमदान केले. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, एनसीसी विभागप्रमुख प्रा. लेफ्टनंट विनायक भोई यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. रोहित शिंगे, प्रा. प्रथमेश गवळी आदी उपस्थित होते.



अब्दुललाट : डीकेएएससी महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाने अनाथ आश्रमातील मुलांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप, अन्नधान्य आदी साहित्य दिले.

28/11/25

28/11/25

केसरी २८ नोव्हेंबर २०२५



इचलकरंजी : यशस्वी खेळाडूंचे अभिवादन करताना प्रा. एस. के. खाडे. सोबत इतर मान्यवर.

# डी.के. ए. एस. सी.च्या बॉक्सिंग खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी :** श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय कोल्हापूर आयोजित शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय बॉक्सिंग पुरुष / महिला स्पर्धेत डी. के. ए. एस. सी.च्या बॉक्सरनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. या खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. यामध्ये साक्षी जाधव हिने ५७ किलो वजनी गटात एकून चार बाऊट खेळून सुवर्ण पदकावर शिक्कामोर्तब केला. तसेच प्रेम लोंढे याने ६० किलो वजनी गटात एकूण तीन बाऊट खेळून सुवर्ण पदक पटकावले, तर प्रणव पेटकर हा ५० किलो वजनी गटात एकूण चार बाऊट खेळून सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला. या तीनही खेळाडूंची निवड कुरुक्षेत्र युनिव्हर्सिटी, हरयाना येथे होणाऱ्या ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात झाली आहे. तसेच या स्पर्धेत ८५ किलो वजनी गटात रामानून सिंग याने रजत पदक व ९० किलो वजनी गटात विवेकानंद चौगुले याने कांस्यपदक पटकावले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी या सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे अधीक्षक प्रकाश कुराडे उपस्थित होते. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन व स्वप्नील सूर्यवंशी याचे सहकार्य लाभले.

28/11/25

28/11/25

सकाळ रविवार, ३० नोव्हेंबर २०२५



इचलकरंजी : आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेतील विजेत्या डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडूंचा सत्कार प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्याहस्ते झाला.

# आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेतील डीकेएएससीला तीन सुवर्णपदके

इचलकरंजी, ता. २९ : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडूंनी अप्रतिम कामगिरी केली. तीन सुवर्ण, एक रजत व एक कांस्य, अशी एकूण पाच पदकांची कमाई करत महाविद्यालयाने स्पर्धेत ठसा उमटवला. तिघांची कुरुक्षेत्र विद्यापीठ (हरियाणा) येथे होणाऱ्या ऑल इंडिया आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे.

स्पर्धेत साक्षी जाधव हिने ५७ किलो वजनी गटात चार बाऊटमध्ये जबरदस्त कौशल्य दाखवत विजेतेपदावर नाव कोरले. प्रेम लोंडे याने ६० किलो वजनी गटात तीन बाऊटमध्ये प्रतिस्पर्ध्याला नमवून सुवर्णपदक पटकावले, तर प्रणव पेटकर याने ५० किलो वजनी गटात चार बाऊटमध्ये दमदार प्रदर्शन करत सुवर्णपदकाचा मान मिळवला. या तीन्ही सुवर्ण विजेत्यांची निवड कुरुक्षेत्र विद्यापीठ, हरियाणा येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बॉक्सिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात झाली आहे. रामानूज सिंग याने ८५ किलो वजनी गटात रौप्यपदक, तर विवेकानंद चौगुले याने ९० किलो वजनी गटात कांस्यपदक मिळवले. प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी पदक विजेत्यांचे अभिनंदन करत राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी अधीक्षक प्रकाश कुराडे उपस्थित होते. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, लेफ्टनंट प्रा. विनायक भोई यांचे मार्गदर्शन व स्वप्नील सूर्यवंशी यांचे सहकार्य लाभले.

01/12/2025

01/12/25

तरुण भारत सोमवार, १ डिसेंबर २०२५

# डीकेएएससीच्या बॉक्सिंग खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ संघात निवड

प्रतिनिधी
इचलकरंजी

श्री शहाजी छत्रपती. महाविद्यालय, कोल्हापूर आयोजित शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय बॉक्सिंग पुरुष, महिला स्पर्धेत डीकेएएससीच्या बॉक्सरनी उत्कृष्ट कामगीरी करत घवघवीत यश संपादन केले आहे.

स्पर्धेत साक्षी जाधव हीने ५७ किलो वजनी गटात एकून चार बाऊट खेळून सुवर्ण पदकावर शिक्कामोर्तब केला. तसेच प्रेम लोंढे याने ६० किलो वजनी गटात एकून तीन बाऊट खेळून सुवर्ण पदक पटकावले. प्रणव पेटकर याने ५० किलो गटात एकूण चार बाऊट खेळून सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला. या तीनही खेळाडूंची निवड कुरुक्षेत्र युनिव्हर्सिटी, हरयाना येथे होणाऱ्या ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी त्यांची शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. तसेच या स्पर्धेत ८५ किलो वजनी गटात रामानूज सिंग याने रजत पदक व ९० किलो वजनी गटात विवेकानंद चौगुले याने कास्य पदक पटकावले आहे.



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठ संघात निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. के. खाडे, मार्गदर्शक शिक्षक.

खेळाडूंचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांनी अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. अधीक्षक प्रकाश कुराडे, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक मोई, स्वप्निल सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले.

०२/१२/२५

०२/१२/२५

केसरी
२ डिसेंबर २०२५/४



संविधान दिन साजरा करताना डॉ. एस के खाडे व प्राध्यापक.

# डी.के.ए.एस.सी महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित दत्ताजीराव कदम कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात भारतीय संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागाने हा कार्यक्रम आयोजित केला.

दि. २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. सुरुवातीस भारतीय संविधानाची प्रत व संविधान शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन प्रभारी प्राचार्य प्रा. व्ही. पी. पाटील आणि प्रा. डी. ए. यादव यांच्याहस्ते करण्यात आले.

स्वागत डॉ. मोहन कांबळे यांनी केले; तर उद्देशपत्रिकेचे सामूहिक वाचन प्रा. विशाल कांबळे यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयातील डॉ. सुभाष जाधव, डॉ. प्रभा पाटील, डॉ. अशोक बोंगुलवार, डॉ. सुनील भोसले, डॉ. अरुण कटकोळे, डॉ. दिगंबर नागर्थवार यांच्यासह सर्व प्राध्यापक, कार्यालयीन प्रबंधक श्री रघुनाथ जोग, अधीक्षक प्रकाश कुराडे, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि विद्यार्थीनी उपस्थित होते.

हा कार्यक्रम राज्यशास्त्र विभागातील डॉ. मोहन कांबळे व डॉ. मीनाक्षी मिणचे यांच्या नियोजनातून यशस्वीपणे पार पडला.

02/12/25

02/12/25